विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोकण परिक्षेत्र

# मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मुंबई क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसीय कृती आराखडा कार्यक्रम

श्री. संजय दराडे,
विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोकण परिक्षेत्र

## विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

### 1 संकेतस्थळ / Website

- कोकण परिक्षेत्राचे संकेतस्थळ नव्याने तयार केले असून त्याची URL. https://konkanrange.mahapolice.gov.in/ अशी असून शासकीय डोमेनवर **Go-Live** आहे

**अ)** संकेतस्थळ वापरण्याकरीता सुलभ व्हावे यासाठी ऑनलाईन सेवेमध्ये E complaint, Cyber Fraud Complaint इ. लिंक तसेच Quick Links Services मध्ये Published FIR's, Police Clearance Services इ. सुविधा उपलब्ध आहेत.

**आ)** परिक्षेत्रामध्ये होणा-या विविध कार्यक्रमांची माहिती नियमितपणे **उपक्रम/कार्यक्रम** या टॅबमध्ये देण्यात येते तसेच परिक्षेत्रातील चांगल्या कामगिरीची माहिती **वृतांकन** या सदराखाली देण्यात येते. तसेच वरिष्ठ अधिकारी, पो.ठाणे प्रभारी अधिकारी यांची माहिती अद्ययावत आहे.

**इ)** माहिती अधिकार अधिनियम कलम 4 (1) (ब) अंतर्गत सर्व माहितीचे (1 ते 17 नमुन्यात) स्वयंप्रकटीकरण करण्यात आलेले आहे.


**ई)** Imperium Solutions, Thane या अधिकृत कंपनीकडून संकेतस्थळाचे सायबर सिक्युरिटी ऑडीट करुन प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले आहे.

**उ)** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत शासकीय कार्यालयामार्फत नागरीकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवांबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

# विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

## 1 संकेतस्थळ / Website




ऑनलाईन सेवा

माहिती अद्यावतीकरण

माहिती अधिकार अधिनियम

सुरक्षितता प्रमाणपत्र

लोकसेवा हक्क अधिनियम





## 2 केंद्र शासनाशी सुसंवाद

- केंद्र शासनाच्या बहुउददेशिय **वाढवण बंदर** प्रकल्प कामावर लक्ष देवून कोणत्याही अडथळयाविना पुर्ण करण्याचे दृष्टीने विशेष लक्ष देत आहोत.
- पालघर जिल्हयातील वाढवण बंदरास जोडणारा **ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्ग** प्रकल्पाचे बाबत चालू जमीन मोजणी बंदोबस्ताच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी पालघर यांच्या समवेत भेट देवून आढावा घेतला.
- **मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन** प्रकल्प डायरेक्टर इटा सुब्रमण्यम यांची जव्हार येथे भेट व अडचणींबाबत चर्चा केली.
- **मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्ग** प्रकल्पाचे प्रादेशिक सीजीएम अंशुमाली श्रीवास्तव यांची भेट व चर्चा केली.
- रत्नागिरी जिल्हयातील गुहागर येथील **कोकण LNG** व **रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट लि. (RGPPL)** या महत्वकांक्षी प्रकल्पांना भेटी देवून त्यांच्या अडचणींबाबत चर्चा.

## 2 केंद्र शासनाशी सुसंवाद





कोकण LNG गुहागर रत्नागिरी

RGPPL गुहागर रत्नागिरी





## 3 स्वच्छता / Cleanliness

**अ)** कोकण परिक्षेत्र कार्यालयातील सन 2024 पर्यंतच्या 8060 अभिलेखांचे दिनांक 18/02/2025 रोजी निदंणीकरण व वर्गीकरण करण्यात आले आहे.

**आ)** एकुण 2621 मुदतबाहय अभिलेख दिनांक 19/02/2025 रोजी नष्ट करण्यात आले.

**इ)** दिनांक 30/03/2025 पर्यंत जड वस्तु संग्रह नोंदवहीमध्ये नोंदी अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत.

**ई)** कोकण परिक्षेत्र कार्यालयातील जड वस्तू संग्रह नोंदवहीमधील 427 जडवस्तूंपैकी 41 जडवस्तू हया निकामी झाल्याने दिनांक 19/02/2025 रोजी निर्लेखीत केलेल्या आहेत.

**उ)** कोकण परिक्षेत्र कार्यालय आस्थापनेवर जुने शासकीय वाहन प्रलंबीत नाही.

# विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

## 3 स्वच्छता / Cleanliness







BEFORE

AFTER







## विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

# 4 तक्रार निवारण

**अ)** आपले सरकार पोर्टलवरील 1 जानेवारी 2025 पुर्वीच्या सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक 16/04/2025 पर्यंत पोर्टलवर प्राप्त 115 तक्रारींचे 100 % निराकरण करण्यात आलेले आहे.

**आ)** पी.जी. पोर्टलवरील 1 जानेवारी 2025 पुर्वीच्या सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक 16/04/2025 पर्यंत पोर्टलवर प्राप्त 03 तक्रारींचे 100 % निराकरण करण्यात आलेले आहे.

### इ) अभ्यांगतांना भेटीसाठी वेळ

**सकाळी 11.00 ते दुपारी 02.00 वा.**

कोकण परिक्षेत्रातील नागरीक, पत्रकार यांच्या व्हॉटस ॲप ग्रुपवर जिल्हयातील पोलीस अधिका-यांच्या मार्फत प्रसिध्दी देण्यात आली आहे.




**ई)** विभागीय आयुक्त स्तरावर दर महिन्याच्या दुस-या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या कार्यालयातील प्रलंबित तक्रारींची संख्या 0 आहे.

# 5 कार्यालयीन सोई सुविधा




अ) पिण्याचे पाणी




आ) पुरुष प्रसाधनगृह



इ) महिला प्रसाधनगृह



इ) प्रतीक्षालय

## विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

# 5 कार्यालयीन सोई सुविधा



उ) नामफलक व दिशादर्शक फलक






उ) कार्यालयाचे सौंदर्यीकरण

## विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

# 6 कामकाजातील सुधारणा

eOffice eFile
A DIGITAL WORKPLACE SOLUTION

**अ)** कोकण परिक्षेत्र कार्यालयात प्रशासकीय कामकाजात 1 जानेवारी 2025 पासून ई-ऑफीस प्रणालीचा 100% वापर करण्यात येत आहे.

➢ कार्यालयातील 5 अधिकारी व 15 अंमलदार यांचे प्रोफाईल पुर्ण झालेले आहेत.

**आ)** ई-ऑफीस प्रणालीत 4 स्तरावर मान्यता घेवून प्रकरणांचा निपटारा करण्यात येतो.

विशेष पोलीस महानिरीक्षक ⇄ कार्यालय अधीक्षक ⇄ प्रमुख लिपीक ⇄ वरिष्ठ/कनिष्ठ लिपिक

**इ)** 1 जानेवारी 2025 पासून कार्यालयात एकुण 1388 टपाल प्राप्त झाले असून सर्व 100 % टपालाची निर्गती करण्यात आलेली आहे.

➢ 1 जानेवारी 2025 पासून कार्यालयात एकुण 58 नस्ती तयार करुन सर्व 100% नस्तींची निर्गती करण्यात आलेली आहे.

**ई)** वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिध्द होणा-या बातम्यांबाबत जिल्हास्तरावर पोलीस उप अधीक्षक दर्जाच्या अधिका-यांची नेमणुक करण्यात आली असून शासन विरोधी प्रसिध्द बातम्यांबाबत त्यांच्याकडून स्पष्टीकरण सादर करण्यात येते.

## विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

**7** **अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयीन बाबी, AI चा वापर**

**अ)** कोकण परिक्षेत्रात पोलीस भरती 2022-23 अंतर्गत 908 पदांची भरती केली असून त्यापैकी 774 नवप्रविष्ठ प्रशिक्षण घेत आहेत.

- कोकण परिक्षेत्रातील जिल्हयांमध्ये सन 2025 मध्ये 38 अधिकारी व 194 अंमलदार यांनी सेवांतर्गत प्रशिक्षण तसेच 237 अंमलदार यांचे उजळणी प्रशिक्षण पुर्ण झाले आहे.
- सर्व अधिकारी व अंमलदार यांचे नविन फौजदारी कायद्याबाबत 100% प्रशिक्षण पुर्ण झाले आहे.

**आ)** परिक्षेत्रातील सर्व 254 अधिकारी व कार्यालयातील 14 कर्मचारी यांचे दिनांक 31/03/2024 पर्यंतचे गोपनीय अहवाल 100% लिहीण्यात आलेले आहेत.

**इ)** कोकण परिक्षेत्र अधिनस्त 14 घटक कार्यालयातील कार्यरत जिल्हा लिपिक संवर्गातील कनिष्ठ व वरिष्ठ श्रेणी लिपीक यांची सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

- कोकण परिक्षेत्रातील सर्व जिल्हयांमध्ये नियमित पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत. तसेच लिपिक वर्ग कर्मचा-यांमध्ये एकुण 21 कनिष्ठ लिपिक ते वरिष्ठ लिपिक अशा पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत.


# विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

**7** **अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक, न्यायालयीन बाबी, AI चा वापर**

**ई)** कोकण परिक्षेत्र कार्यालयात एकही प्राथमिक चौकशी प्रकरण प्रलंबित नाही. तसेच प्रलंबित 1 विभागीय चौकशी प्रकरण आठवडयाच्या आतील आहे. एकुण 6 न्यायालयीन प्रकरणे सुरु असून मा.न्यायालयात सदर प्रकरणाबाबत नियमित पाठपुरावा करण्यात येतो.

**उ)** अधिकारी व कर्मचारी यांचे कामात अचुकपणा येण्यासाठी कृत्रिम बुध्दिमता तंत्रज्ञानाचा वापर याबाबत AI in Predictive Policing and Crime Detection व Comouflage of AI in Cyber Crimes या विषयांवर 280 अधिकारी व 1248 अंमलदार यांना व्हीसीव्दारे प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच कृत्रिम बुध्दिमता तंत्रज्ञानाचा कार्यालयीन कामकाजात वापर करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे.





## 8 आर्थिक व औदयोगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

**अ)** गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा भेटी दरम्यान बोईसर, पाताळगंगा, खालापूर, लोटे या औदयोगिक क्षेत्रास तसेच कोकण LNG व RGPPL या कंपन्यांस भेटी देवून उद्योजक यांच्या तक्रारी जाणून घेवून त्यांचे निराकरण केले.

- ➢ रायगड जिल्हयात तक्रारींकरीता **रायगड समाधान** ऑनलाईन पोर्टल विकसीत तसेच खालापूर औद्योगिक वसाहतीमध्ये **इसांबे पोलीस मदत केंद्र** स्थापन.
- ➢ ठाणे व पालघर जिल्हयांच्या वेबसाईटवर तक्रारींकरीता स्वतंत्र टॅब.

**आ)** पालघर, रायगड व रत्नागिरी जिल्हयामध्ये भेटी दरम्यान औद्योगिक क्षेत्रामधील कामगार वर्ग व विविध संघटनांचे पदाधिकारी यांची भेट घेवून तक्रारी जाणून घेतल्या तसेच ज्वेलर्स असोशिएशन्स व इतर व्यापारी संघटनांच्या बैठका घेवून त्यांनी उपस्थित केलेल्या समस्यांसाठी उपाययोजना करण्यात आल्या.

**इ)** गुंतवणुकदार उद्योजकांच्या अडचणीचे निराकरण करण्याच्या अनुषंगाने महाड औद्योगिक क्षेत्रात वाहतुक कोंडीबाबत उपाययोजना केल्या.

- ➢ बोईसर पो.ठाणे जि.पालघर येथे चोरी रोखण्यासाठी सीसीटीव्ही जाळे उभारले.
- ➢ उद्योजकांना त्रास देणा-यांविरुध्द ठाणे ग्रामीण घटकात खंडणीसारखा तसेच रत्नागिरी जिल्हयात खेड पो.ठाणे येथे व रायगड जिल्हयात 4 गुन्हे दाखल केलेले आहेत.

**ई)** गुंतवणुकदार उदयोजकांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरण करण्याचे अनुषंगाने पोलीस विभागाकडील NOC संबंधातील प्रलंबित प्रकरणे तत्काळ निपटारा करण्याबाबत पोलीस अधीक्षक यांना आदेशित करून 17 प्रलंबित NOC वितरीत करण्यात आल्या.

# विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

## 8 आर्थिक व औदयोगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन



बोईसर MIDC CCTV उदघाटन



लोटे MIDC उद्योजक बैठक



इसांबे मदतकेंद्र रायगड उदघाटन

रायगड समाधान प्रणाली उद्घाटन



घरडा केमिकल कंपनी भेट



## 9 नाविन्यपुर्ण उपक्रम 1 - सुकर जीवनमान

### 1. संवाद कौशल्य याबाबत प्रशिक्षण. (Soft Skills And Public Speaking Training)

- नागरीकांमध्ये पोलीस ठाण्यातील पोलीस, वाहतुक पोलीस हे उद्ध्ट बोलतात, सौजन्यपुर्ण वागत नाहीत अशा प्रकारचे बोलने ऐकु येते. बहुतांशवेळा सर्वसामान्य नागरीकांच्या मनात पोलीसांबददल वाईट प्रतिमा निर्माण होते.
- यामध्ये बदल होण्यासाठी **Arabhi Creation,** ठाणे या संस्थेमार्फत ठाणे अंमलदार, भरोसा सेल कर्मचारी, वाहतुक अंमलदार व अधिकारी यांना प्रशिक्षण देण्याचे योजले.
- पोलीसांमधील जबाबदारी, सौजन्यशिलता, एकात्मता, संघ भावना, नाविन्यपुर्ण उपाययोजना व समस्यांचे निराकरण अशा Soft Skills विकसीत करण्याचे अनुषंगाने तसेच तक्रारदारांशी संवाद, नियंत्रण कक्षातील कामकाज सुत्र, महिला आणि बालकांसबधीत तक्रारी हाताळणे, कामातील ताणतणावाचे नियोजन अशा अनेक विषयांवर सदर उपक्रमातर्गत प्रशिक्षण देण्यात आले.
- कोकण परिक्षेत्रातील एकुण 143 पोलीस अधिकारी व 1521 अंमलदार यांना प्रशिक्षीत करण्यात आले.
- सदर प्रशिक्षणामुळे जबाबदारी, सौजन्यशिलता, एकात्मता, संघ भावना, नाविन्यपुर्ण उपाययोजना व समस्यांचे निराकरण या गुणांचा विकास होण्यास मदत झाली आहे.
- सदर प्रशिक्षणामुळे पोलीसांची नागरीकांमधील प्रतिमा सुधारेल, पोलीस व नागरीक यांच्यात सुसंवाद होवून नागरीकाना न्याय मिळण्यास मदत होईल.

**प्रशिक्षण घेतलेले अधिकारी व अंमलदार**

| तपशिल | पालघर | ठाणे ग्रा. | रायगड | रत्नागिरी | सिंधुदुर्ग | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| पो.अधिकारी | 29 | 30 | 10 | 36 | 38 | **143** |
| पो.अंमलदार | 389 | 297 | 270 | 244 | 321 | **1521** |

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

9 नाविन्यपुर्ण उपक्रम 1 - सुकर जीवनमान

## 2) राहणीमान व आहारातील बदल -

- कोकण परिक्षेत्र घटकामधील सन 2023 मध्ये 17 व सन 2024 मध्ये 21 अधिकारी/अंमलदार विविध आजारांमुळे मृत झाल्याचे निदर्शनास आले आहे.
- पोलिसांचे धकाधकीचे जीवन, अनियमित जेवणाच्या वेळ तसेच अनियमित कामाची वेळ यामुळे त्यांना उच्च रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा यासारखे अनेक आजार जडतात.
- पोलीसांच्या जिवनशैलीत बदल करुन त्यांचे जीवनमान उंचविण्याच्या दृष्टीने **आहार तज्ञ श्रीमती सायली भोसले (The Indian Nutrition Coach)** यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा नाविण्यपुर्ण उपक्रम सुरु केला.
- उच्च रक्तदाब, मधुमेह व लठ्ठपणा यांच्या High Risk मधील प्रत्येक जिल्ह्यातील 25 असे एकुण 125 अधिकारी /अंमलदार यांची निवड करुन त्यांना प्रोटीनयुक्त आहार प्लॅन देवून तसेच त्यांना नियमित व्यायामाचे वेळापत्रक तयार करुन नियमित मार्गदर्शन करण्यात येते.





# विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

## 9 नाविन्यपुर्ण उपक्रम 1 - सुकर जीवनमान

**2) राहणीमान व आहारातील बदल -**

➢ दिनांक 05/03/2025 रोजीपासून सदरचा 60 दिवसांचा उपक्रम सुरु करण्यात आला असून उपक्रम चालू झाल्यापासून लठ्ठपणा असलेल्यांच्या वजनात घट तसेच जेवणामध्ये पोषक बदल करण्यात यश प्राप्त झाले आहे.











### 30 दिवसांमध्ये दिसून आलेले बदल

| वजन कमी प्रमाण | अधिकारी / कर्मचारी संख्या |
|---|---|
| 5-6 किलो | 3 |
| 3-4 किलो | 7 |
| 2-3 किलो | 48 |
| 1-2 किलो | 56 |
| Sugar Level 200 Mg/dL to 180 Mg/dL | 1 |

## विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

10 **नाविन्यपुर्ण उपक्रम 2 - कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा**

**1) अर्ज संनियंत्रण प्रणाली (Application Tracking and Management System) (Web Portal)**

- ➢ कोकण परिक्षेत्र विस्तीर्ण पसरलेले असल्याने तक्रारदारास कार्यालयात तक्रार अर्ज दिल्यानंतर त्यांचा अर्जाच्या स्थितीबाबत माहिती घेण्यासाठी पुन्हा परिक्षेत्र कार्यालयास लांबून यावे लागते किंवा फोनवरुन संपर्क करावा लागतो.
- ➢ अर्जदार यांनी दिलेला अर्ज संबधीत कार्यालयास चौकशीसाठी गेला किंवा याची त्यांना खात्री होत नव्हती.
- ➢ त्यामुळे अर्जदारास त्यांने केलेल्या अर्जाबाबत माहिती मिळण्यासाठी सदर वेब पोर्टल दिनांक 15/03/2025 रोजीपासून कार्यान्वित करण्यात आले आहे.
- ➢ अर्जदार परिक्षेत्र कार्यालयात आल्यानंतर त्यांचेकडून प्राप्त अर्ज सदर वेबपोर्टलवर भरण्यात येतो तदनंतर सदरचा अर्ज संबधीत पोलीस अधीक्षक कार्यालयात ई-मेलवर पाठविण्यात येतो. तसेच सदर अर्जाबाबत तक्रारदार यास त्याचे मोबाईल क्रमांकावर सिस्टीमव्दारे संबधीत पोलीस अधिकारी यांच्या मोबाईल क्रमांकासह SMS पाठविला जातो. त्यामुळे त्याचा अर्ज संबधीत कार्यालयास गेल्याबाबत खात्री होते व अर्जाबाबत माहिती घेवू शकतो.

# विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र

10


## नाविन्यपुर्ण उपक्रम 2 - कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा


**1) अर्ज संनियंत्रण प्रणाली (Application Tracking and Management System) (Web Portal)**

- वेब पोर्टल चालू झाल्यापासून दिनांक 16/04/2025 पर्यंत एकुण 67 अर्ज प्राप्त झाले असून सर्व तक्रारदार यांना त्यांचे अर्जाबाबत SMS प्राप्त झाले आहेत व सदरबाबत तक्रारदार यांनी कार्यालयात फोन करुन समाधान व्यक्त केला आहे.
- सदर प्रणालीमध्ये विविध प्रकारचे रिपोर्ट तयार करण्याची व्यवस्था असल्याने प्राप्त अर्जांबाबत पर्यवेक्षण करणे सोईस्कर झाले आहे.









## नाविन्यपुर्ण उपक्रम 2 - कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

### 2. व्हिसीव्दारे आज्ञांकित कक्ष ( Online O.R.)

- कोकण परिक्षेत्राच्या विस्तीर्ण भौगोलिक रचनेमुळे आज्ञांकीत कक्षास हजर राहण्यासाठी कर्मचा-यांना लांबचा प्रवास करावा लागतो. तसेच येण्याजाण्यासाठी साधनांचीही कमतरता आहे.
- आज्ञांकीत कक्षास हजर राहण्याकरीता वेळेचा व पैशाचा अपव्यय होतो.
- सदरबाबी लक्षात घेवून जास्तीतजास्त अधिकारी/कर्मचारी वर्गास त्यांच्या अडीअडचणी मांडणे सुलभ व्हावे यासाठी व्हीसीव्दारे "**आज्ञांकीत कक्ष (Online O.R.)"** हा उपक्रम दिनांक 03/03/2025 पासून सुरु करण्यात आला.
- प्रत्येक आठवडयात शुक्रवार पर्यंत प्राप्त अर्जांचे **दर सोमवारी 12.00 ते 02.00 वा.** दरम्यान व्ही.सी.व्दारे आज्ञांकीत कक्ष घेण्यात येतो.
- उपक्रमांतर्गत दिनांक 16/04/2025 पर्यंत एकुण 88 अधिकारी, अंमलदार व लिपिक यांनी अडीअडचणी मांडल्या व त्याचे निराकरण करण्यात आले त्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष शारिरीक व मानसिक त्रास कमी झाला.

### आज्ञांकीत कक्ष

| तपशिल | पो.अधिकारी | पो.अंमलदार | लिपीक वर्ग | एकुण |
|---|---|---|---|---|
| दिनांक 01/02/24 ते 16/04/24 (प्रत्यक्ष आज्ञांकीत कक्ष) | 13 | 6 | 3 | **22** |
| दिनांक 03/03/25 ते 16/04/25 (व्हीसीव्दारे आज्ञांकीत कक्ष) | 41 | 36 | 11 | **88** |